31-01-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 01/30/2025 11:00 PM Page 1

निवडक

शिरसई साई देवस्थानचा उद्या वर्धापनदिन

टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. ३० : साईनगर शिरसई येथील श्री साईबाबा देवस्थान ट्रस्टचा १३ वा वार्षिक वर्धापनदिन सोहळा शनिवार, दि. १ फेब्रुवारी रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा केला जाणार आहे. या दिनी सकाळी ७.४५ पूजा व आरती,सकाळी १० वाजता होम हवन शुध्दीकरण,११ वा गणेश पूजन, पूण्याह वाचन,श्री सत्य साई आरती, गाऱ्हाणे व तीर्थप्रसाद व १.३० वा महाप्रसाद होईल. संध्याकाळी ५.३० श्रींची दिंडी सोबत पालखीतून मिरवणूक होईल.सातेरी केळबाय चरवणे सत्तरी यांची दिंडी व तदनंतर आरती, तीर्थप्रसाद, महाप्रसाद होईल. रविवार, दि. २ फेब्रुवारी सकाळी ६ वाजता हरिपाठ,आरती व महाप्रसाद होईल.तरी भाविकांनी उपस्थित राहून श्रीकृपेस पात्र व्हावे असे आवाहन देवस्थान समिती अध्यक्ष अतुल वासीन, खजिनदार रितेश चोडणकर व सचिव विवेक पार्सेकर यांनी केले आहे.

नानोडा येथे उद्या गणेश जयंती

टीम दैनिक हेराल्ड

साळ, दि. ३० : नानोडा – डिचोली येथील श्री शांतादुर्गा कळंगुटकरीण पंचायतन गणेश मंदिरात शनिवार, दि. १ फेब्रुवारी रोजी गणेश जयंती साजरी करण्यात येणार आहे. त्यानिमित्त ब्राह्मणकरवी धार्मिक विधी, अभिषेक, गणेश दर्शन, गणेश पूजन, संध्याकाळी ५ वा. भजन होऊन आरतीने गणेश जयंती उत्सवाची सांगता होणार आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रींच्या कृपाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे कळविण्यात आले आहे.

लाडफे येथील सातेरी केळबाय देवस्थानचा उद्या वर्धापनदिन

टीम दैनिक हेराल्ड

साळ, दि. ३० : लाटंबार्से पंचायत क्षेत्रातील लाडफे येथील श्री देवी सातेरी केळबाय व पंचायतन देवस्थानचा सतरावा प्रतिष्ठापना वर्धापनदिन सोहळा दि. १ फेब्रुवारी रोजी श्री सातेरी मंडपात विविध कार्यक्रमाविषयी साजरा करण्यात येणार आहे. सकाळी नवचंडीस प्रारंभ, सकाळी ९ वाजल्यापासून गणपती पूजन, पुण्याहवाचन , मातृका पूजन, नांदी श्राद्ध , देवता पूजन, सप्तशती पाठ वाचन , संध्याकाळी ७ वा. भजन होईल.

म्हापशात आज भक्ती सांज

टीम दैनिक हेराल्ड

शिवोली, दि. ३० : गणेशपुरी विश्वस्त मंडळ गणेशपुरी, म्हापसा येथे उद्या शुक्रवार, दि. ३१ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वा पंडित रघुनंदन पणशीकर यांचा भक्ति सांज हा गायनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. त्यांना चिन्मय कोल्हटकर हार्मोनियम, मयंक बेडेकर तबला, किशोर तेली पखवाज व रिदेश दाभोलकर यांची मंजिरी साथ असेल.

पैंगीणमध्ये २ रोजी रक्तदान शिबिर

टीम दैनिक हेराल्ड

काणकोण, दि. ३० : पैंगीणच्या ब्लड रिलेशन फाउंडेशने अन्य विविध संघटनांच्या संयुक्त विद्यमाने येत्या २ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० ते १२.३० पर्यंत महालवाडा पैंगीण येथील आपत्कालीन आसरा स्थळाच्या सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी प्रवीण भट (८७८८१८७७००) किंवा अनुप पैंगीणकर (९३०७३२४१९६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

करमलघाट येथील शक्ती गणपती मंदिरात उद्या गणेश जयंती

टीम दैनिक हेराल्ड

काणकोण, दि. ३० : मडगाव – काणकोण महामार्गावरील करमलघाट येथील श्री शक्ती गणपती मंदिराजवळ १ फेब्रुवारी रोजी माघ मास गणेश जयंती निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ८ वा. अभिषेक, त्यानंतर गणहोम, दुपारी १२.३० वाजता पुजा महाप्रसाद, संध्याकाळी ५ वा. महापूजा आणि तीर्थप्रसादाने या उत्सवाची सांगता होणार आहे.

टीम इंडिया मालिका जिंकण्याच्या इराद्याने उतरणार

इंग्लंडविरुद्ध आज चौथा टी- ट्वेंटी सामना : रिंकू सिंगला संधी मिळण्याची शक्यता

पुणे, दि. ३० : भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील चौथा सामना शुक्रवारी पुण्यात होणार आहे. या सामन्यात भारतीय संघ मालिकेत अजेय आघाडी घेण्याचा प्रयत्न करेल. सध्या सूर्यकुमारच्या नेतृत्वाखालील संघ २-१ ने आघाडीवर आहे. आता त्याची नजर चौथी टी-२० जिंकून सलग पाचवी मालिका जिंकण्यावर असेल.

संजू सॅमसनचा वेगवान गोलंदाजांविरुद्धचा कमजोरपणा आणि रिंकू सिंगचा खराब फॉर्म आणि फिटनेस हे शुक्रवारी इंग्लंडविरुद्धच्या चौथ्या टी-२० सामन्यापूर्वी भारतीय संघ व्यवस्थापनासाठी चिंतेचे कारण ठरणार आहे. राजकोटमधील तिसरा सामना गमावल्यानंतर भारतीय संघाला २ फेब्रुवारीला मुंबईत होणाऱ्या शेवटच्या सामन्यापूर्वी मालिका जिंकण्याची आणखी एक संधी आहे. तिन्ही सामन्यांत तो फिल सॉल्टकडे झेल देऊन पॅव्हेलियनमध्ये परतला.

रिंकू सिंगच्या पाठीच्या समस्येमुळे ध्रुव जुरेलला सातव्या क्रमांकावर वगळण्यात आले असले तरी तो या फॉरमॅटमध्ये बसू शकलेला नाही. रिंकूला पहिल्या दोन सामन्यांसाठी विश्रांती देण्यात आली होती आणि कदाचित चौथ्या सामन्यासाठी ती फिट असेल. मात्र, रिंकूही तिच्या सर्वोत्तम फॉर्ममध्ये नाही.

दुसरीकडे, मोहम्मद शमीने प्रदीर्घ कालावधीनंतर संघात पुनरागमन करत राजकोटमध्ये चांगले पुनरागमन केले आहे. जसप्रीत बुमराहच्या अनुपस्थितीत भारताचा सर्वोत्तम टी-२० गोलंदाज अर्शदीप सिंगला स्थान मिळाल्यास तो पॉवरप्लेमध्ये यश मिळवू शकतो का, हे पाहणे बाकी आहे.

दुसरीकडे, जोस बटलरच्या नेतृत्वाखालील इंग्लंडचा संघ मालिकेत २-२ अशी बरोबरी साधण्याच्या इराद्याने उद्या मैदानात उतरेल. तिसऱ्या सामन्यात गोलंदाजांनी केलेल्या शानदार कामगिरीच्या जोरावर इंग्लंडने विजय मिळविला होता. त्यामुळे इंग्लंड संघाचे मनोबल उंचावलेले असेल.

संभाव्य प्रतिस्पर्धी संघ

भारत: सूर्यकुमार यादव (कर्णधार), संजू सॅमसन, अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, हार्दिक पंड्या, रमणदीप सिंग, शिवम दुबे, अक्षर पटेल, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, मोहम्मद शमी, वरुण चक्रवर्ती, रवी बिश्नोई, वॉशिंग्टन सुंदर, ध्रुव जुरेल.

इंग्लंड : जोस बटलर (कर्णधार), रेहान अहमद, जोफ्रा आर्चर, गुस ऍटकिन्सन, जेकब बेथेल, हॅरी ब्रूक, ब्रायडन कार्स, बेन डकेट, जेमी ओव्हरटन, जेमी स्मिथ, लियाम लिव्हिंगस्टोन, आदिल रशीद, साकिब महमूद, फिल सेल्टॉफ, मार्क वुड.

शार्दुल ठाकूरची मेघालयविरुद्ध हॅट्ट्रिक

मुंबई, दि. ३० : भारताचा वेगवान गोलंदाज शार्दुल ठाकूरने गुरुवारी मुंबईतील शरद पवार क्रिकेट अकादमीमध्ये रणजी ट्रॉफी २०२४-२५ सामन्याच्या पहिल्या दिवशी मेघालयविरुद्ध हॅटट्रिक घेत कमाल केली. मेघालयाच्या संघाला केवळ ८६ धावांत गुंडाळले. त्यानंतर मुंबई संघाने पहिल्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत २ गड्यांच्या मोबदल्यात २१३ धावा केल्या आहेत.

पाहुण्या संघाविरुद्ध नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेणाऱ्या मुंबईसाठी गोलंदाजीची सलामी देताना ठाकूरने मेघालयचा सलामीवीर निशांत चक्रवर्तीला पहिल्याच षटकात एकही धाव न देता पॅव्हेलियनमध्ये पाठवले. यानंतर तिसऱ्याच षटकात हॅट्रिक घेत खळबळ उडवून दिली.

प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये एखाद्या संघाच्या पहिल्या ६ विकेट्स सर्वात कमी धावसंख्येवर पडण्याच्या बाबतीत मेघालय संघ आता या यादीत दुसऱ्या स्थानावर आहे. या यादीत पहिल्या स्थानावर एमसीसी संघ आहे, ज्याने १८७२ मध्ये काउंटी हंगामात शून्य धावांवर आपले पहिले सहा विकेट्स गमावले होते, त्यानंतर या यादीत तिसऱ्या स्थानावर ऑक्सफर्ड विद्यापीठाचा संघ आहे, ज्याने १८६७ मध्ये तीन धावांवर पहिल्या ६ विकेट्स गमावल्या होत्या.

शार्दुल ठाकूरने सामन्याच्या सुरुवातीलाच हॅट्रिक घेत मेघालय संघाला गुडघे टेकण्यास भाग पाडले. त्याच्या हॅट्रिकच्या जोरावर मेघालयने आपले ६ फलंदाज अवघ्या २ धावांत गमावले. शार्दुल ठाकुरने षटकाच्या शेवटच्या तीन चेंडूंवर बी अनिरुद्ध, सुमित कुमार आणि जसकिरत यांना शून्यावर बाद करून ठाकूरने प्रथम श्रेणीची हॅट्रिक साधली. ३३ वर्षीय ठाकूरने गेल्या सामन्यात मुंबईसाठी शानदार शतक झळकावले होते, ज्यामध्ये गतविजेत्या संघाला त्याच मैदानावर गेल्या आठवड्यात जम्मू आणि काश्मीरकडून पराभव पत्करावा लागला होता. त्यामुळे त्यांची बाद फेरीत जाण्याची शक्यता संपुष्टात आली होती. मात्र, शार्दुल ठाकुरने पुन्हा एकदा चमकदार कामगिरीत टीम इंडियात पुनरागमनासाठी भक्कम दावेदारी केली आहे. शार्दुल मुंबईसाठी हॅट्रिक घेणारा पाचवा गोलंदाज ठरला. त्याच्या आधी जहांगीर बेहरामजी खोत, उमेश नारायण कुलकर्णी, अब्दुल मुसा भोय इस्माईल आणि रॉयस्टन हेरॉल्ड डायस यांनी ही कामगिरी केली आहे. एकेकाळी मेघालयने दोन धावांत सहा विकेट गमावल्या होत्या. त्यानंतर खालच्या क्रमवारीत प्रिंगसंग संगमाच्या १९ धावा, कर्णधार आकाश चौधरीच्या १६ धावा, अनिश चरकच्या १७ धावा आणि हिमन फुकनच्या २८ धावांच्या जोरावर मेघालय संघाला ८६ धावांपर्यंत मजल मारता आली.

यून्स भावंडांची खुल्या मिश्र दुहेरी उपांत्यपूर्व फेरीत धडक

गद्रे गास्पर डायस ओपन २०२५

पणजी, दि. ३० : ऐश्वर्या आणि सिद्धार्थ न्यून्स यांनी गद्रे गास्पर डायस ओपन २०२५ मधील खुल्या मिश्र दुहेरी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवला. त्यांनी अनुप आणि त्विषा सरदेसाई या पिता-पुत्री जोडीचा ६-३ असा पराभव केला.

मिरामार येथील क्लुब टेनिस दे गास्पर डायसच्या कोर्टवर सुरू असलेल्या या स्पर्धेत खुल्या महिला एकेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीचे सामनेही पार पडले. नताशा पाल्हा सोअरिस आणि आंद्रिया अल्मेदा यांनी अनुक्रमे तिथी भूमकर आणि हॅझल फर्नांडिस यांचा ६-० असा सहज पराभव केला. त्रिशा विनोद हिने आस्था दुआ हिच्यावर ६-१ असा विजय मिळवला, निशी सिक्रेरा हिने अंजली फिलिप हिचा ६-२ असा पराभव केला, तर प्राप्ती शेट्टी आणि रायसा मर्गुलहाओ यांनी निधी सिक्रेरा आणि भक्ती कोपर्डे यांचा ६-३ असा पराभव करत पुढील फेरीत प्रवेश केला.

खुल्या पुरुष एकेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत श्रेयस प्रसाद याने हुसैन शेख याला ६-१ असे सहज पराभूत केले. खुल्या पुरुष दुहेरीच्या दुसऱ्या फेरीत सायेल गजिंकर/जय पवार यांनी ऋषभ बेरिया/कृष्ण वळवोईकर यांना ६-१ असे पराभूत केले. खुल्या पुरुष एकेरी उपांत्यपूर्व फेरीत बेस्ट ऑफ थ्री' मिनी सेट्स स्वरूपातील सामन्यांमध्ये, ईशान खदीर याने निशाद शेवडे याचा ४-१, ४-१ असा सहज पराभव केला. श्रेयस प्रसाद याने मनो छाब्रा याच्यावर ४-३, ४-१ असा विजय मिळवला, तर चुरशीच्या सामन्यात विशाल याने ॲशली डिसा याचा १-४, ४-१, ४-१ अशा फरकाने पराभव केला.

गद्रे गास्पर डायस ओपन २०२५ ही स्पर्धा क्लुब टेनिस द गास्पर डायस आणि गोवा राज्य टेनिस संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने गद्रे ग्रुपच्या सहकार्याने आयोजित केली जात आहे.

जोश इंग्लिसने दमदार शतक

श्रीलंका बॅकपूटवर : ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावात ६ बाद ६५४ धावा

गॅले, दि. ३० : गॅले येथे खेळल्या गेलेल्या श्रीलंकेविरुद्ध पहिल्या कसोटीत ऑस्ट्रेलियाचा यष्टीरक्षक फलंदाज जोश इंग्लिसने ९० चेंडूत शतक ठोकले. या शतकाच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने पहिला डाव ६ बाद ६५४ धावांवर घोषित केला. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा श्रीलंकेने ३ गडी गमावून ४४ धावा केल्या होत्या. जोशने ९४ चेंडूत १० चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने १०२ धावांची खेळी महत्वपूर्ण खेळी केली.

गुरुवारी श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियाचा सलामीवीर उस्मान ख्वाजाने त्याच्या कसोटी कारकिर्दीतील पहिले द्विशतक झळकावले. प्रभात जयसूर्याच्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर धाव घेत उस्मान ख्वाजाने २९० चेंडूत आपले द्विशतक पूर्ण केले. यासह, तो श्रीलंकेत द्विशतक करणारा पहिला ऑस्ट्रेलियन खेळाडू बनला. यादरम्यान त्याने १६ चौकार आणि एक षटकार मारला. उस्मान ख्वाजाने ३५२ चेंडूत २३२ धावांची खेळी केली. कर्णधार स्मिथने १४१ तर इंग्लिशने १०२धावा केल्या. या तीन फलंदाजांच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ६ बाद ६५४ धावांवर आपला पहिला डाव घोषित केला.

त्यानंतर श्रीलंका संघाने आपल्या डावाला सुरुवात केली. पण ओशाडा फर्नांडो (७), दिमुख करुणारत्ने (७) आणि अँजिलो मॅथ्यूज (७) हे स्वस्तात माघारी परतले. त्यामुळे दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा श्रीलंकेची स्थिती ३ बाद ४४ अशी झाली होती. दिनेश चंदिमल ९ धावांवर तर कामिंडो मेंडिस १३ धावांवर खेळत होते.

आरोप सिद्ध करा, अन्यथा राजीनामा द्या

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पाटकरांना आव्हान : माजी पंचसदस्य वायंगणकरांकडून वक्तव्याचा निषेध

टीम दैनिक हेराल्ड

मांद्रे : आमदार जीत आरोलकर यांच्या समर्थकांच्या पत्रकार परिषदेत प्रवीण वायंगणकर, सागर तिळवे, संतान फर्नांडिस, रजनी इब्रामपुरकर, सोनाली माजी, अनुपमा मयेकर व किशोर नाईक

हरमल, दि. ३० : हरमलमधील शॅकमधील प्रकरणात अमर बांदेकर या तरूणाच्या खूनप्रकरणाचे राजकारण न करता, शुद्ध भावनेने वक्तव्य करण्याची गरज आहे. आमदार जीत आरोलकर त्या शॅकमध्ये दररोज येऊन हप्ते गोळा करीत असल्याचा आरोप करून स्वतःच्या अकलेचे तारे तोडले आहेत,त्याच्या तोंडी अशी भाषा शोभत नाही. पाटकर यांनी पुराव्यानिशी सिद्ध करावे, अन्यथा राजीनामा द्यावा, असे आव्हान हरमलचे माजी पंच व माजी गटाध्यक्ष प्रवीण वायंगणकर यांनी मांद्रे येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिले आहे.

मांद्रे मतदारसंघाचे आमदार जीत आरोलकर यांच्याबाबत केलेल्या वक्तव्याचा निषेध केला. आमदार आरोलकर सामाजिक राजकरणात सक्रिय असून सामान्य लोकांच्या हितासाठी वावरत असल्याचे त्यांनी सांगितले. पॅराग्लायडिंग बाबत दिशाभूल वक्तव्ये करू नये, त्यांनी खात्री करावी व तोंडाला येईल ते बरळू नये. या मतदारसंघात आल्यास त्यांना त्याचा जाब विचारणार असून त्यांनी प्रदेशाध्यक्ष पदाच्या खुर्चीवर बसण्याचा हक्क गमावला असल्याचे वायंगणकर यांनी सांगितले.

हरमल येथे सी फूड फेस्टिव्हल झाल्याने पाटकर यांना पोटशूळ का झाला, हे कोडे आहे. तीन कोटींचा फेस्टीव्हल नसून त्याची आवश्यक माहिती घ्यावी व मगच विधान करावे. आमदार आरोलकर चांगले काम करीत असल्याने त्याच्या पोटात दुखत असावे, असे वायंगणकर यांनी सांगितले.

काँग्रेसचे अमित पाटकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री डॉ प्रमोद सावंत, पर्यटनमंत्री रोहन खवंटे व आमदार जीत आरोलकर यांच्यावर नाहक टिप्पणी केली आहे. काँग्रेसचे अध्यक्ष अमित पाटकर यांनी मांद्रे गट समितीचे अध्यक्ष नारायण रेडकर यांच्याकडून आवश्यक माहिती घ्यावी व मगच बोलावे, असे सागर तिळवे यांनी सांगितले. राज्याचे नेतृत्व खंबीर असून चांगल्या पद्धतीने राज्य सांभाळले आहे. हरमलच्या त्या श्याकचा परवाना रद्द केला, शॅक जमीनदोस्त करण्याचा आदेश तसेच २५ लाख रुपये दंडात्मक कारवाई करून पर्यटनमंत्री खवटे किती गंभीर आहेत, याची कल्पना येते. त्या बांदेकर कुटुंबियांच्या पाठीशी आम्ही असून,त्यांना नुकसानभरपाई मिळावी, यासाठी आमचे प्रयत्न असतील, असे तिळवे यांनी सांगितले.

फोंडा : सेपॅकटॅकरो स्पर्धेतील महाविद्यालीयन पुरुष विजेत्या संघाला चषक प्रदान करताना कृषी मंत्री रवी नाईक. सोबत विशेष अतिथी माजी प्राचार्य डॉ. अनिल डिंगे, माजी उपमुख्यमंत्री चंद्रकांत कवळेकर, प्राचार्य डॉ. राजय पवार, प्राचार्य डॉ. शेखर सावंत व मान्यवर.

प्रशिक्षकांमुळे घडतात उत्तम खेळाडू..!

टीम दैनिक हेराल्ड

कृषी मंत्री रवी नाईक : सेपॅकटॅकरो स्पर्धेला भरघोस प्रतिसाद

फोंडा, दि. ३०: खेळामुळे शारीरिक तंदुरुस्ती येऊन मानसिक आरोग्यदेखील सुधारले जाते. खेळामुळे जीवनात शिस्त येते. ही शिस्त आणण्यात प्रशिक्षकांचे योगदान अत्यंत महत्त्वाच असते. प्रशिक्षकांमुळेच उत्तम खेळाडू घडतात, त्यामुळे प्रशिक्षकांचा नेहमी सन्मान करावा असे प्रतिपादन राज्याचे कृषी मंत्री रवी नाईक यांनी फोंडा येथे केले.

स्वामी विवेकानंद विद्या प्रसारक मंडळाचे वाणिज्य महाविद्यालय बोरी आणि गोवा कला अकादमीचे थिएटर ऑफ आर्ट महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित केलेल्या सेपॅकटॅकरो स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी विशेष अतिथी म्हणून राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा गोवा सेपॅकटॅकरो संघटेनेचे अध्यक्ष चंद्रकांत कवळेकर, पीईएस महाविद्यालय फर्मागुढीचे माजी प्राचार्य डॉ. अनिल डिंगे यांच्यासह गोवा कला अकादमीचे थिएटर ऑफ आर्ट महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजय पवार, स्वामी विवेकानंद विद्या प्रसारक मंडळाच्या वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शेखर सावंत, शारीरिक शिक्षण संचालक स्वप्नील भोईप, डॉ. यशोधन खराडे, गोवा सेपॅकटॅकरो संघटेनेचे सचिव सूरज देसाई आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेतील महाविद्यालयीन पुरुष गटात सीईएस महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला. तर द्वितीय क्रमांक मिरामार येथील धेंपे कला आणि विज्ञान महाविद्यालय तर तृतीय क्रमांक मडगाव येथील दामोदर महाविद्यालयाने पटकावला. महाविद्यालयीन महिला गटात सरकारी महाविद्यालय खांडोळा यांनी प्रथम क्रमांक तर डॉन बास्को महाविद्यालयाने द्वितीय क्रमांक तर तृतीय क्रमांक पार्वतीबाई चौगुले महाविद्यालयाने पटकावला.

उच्च माध्यमिक स्तरावर मुलांच्या गटात शिवोली येथील सेंट झेवियर उच्च माध्यमिक विद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला. तर द्वितीय क्रमांक कुर्टी येथील कामाक्षी उच्च माध्यमिक विद्यालय तर तृतीय क्रमांकाचा मानकरी सीईएस उच्च माध्यमिक विद्यालय ठरले. मुलींच्या गटात कुंकळ्ळी युनायटेड उच्च माध्यमिक यांनी प्रथम क्रमांक, तर हरमल पंचक्रोशी उच्च माध्यमिक दुसऱ्या स्थानावर तर विद्या प्रबोधिनी उच्च माध्यमिक विद्यालयाने तिसरा क्रमांक पटकावला.

गोवा सेपॅकटॅकरो संघटनेच्या सहकार्याने फोंडा क्रीडा प्रकल्पाच्या इनडोअर स्टेडियममध्ये आयोजित केलेल्या या स्पर्धेत राज्यातील तब्बल ३४ संघ आणि १७० खेळाडू सहभागी झालेले होते.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १४९ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 149 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .